**१ अर्ज, अर्हता, सर्वसाधारण पात्रता, वयोमर्यादा, इत्यादी**

**१.१ अर्ज** :-

१.१.१ भरावयाच्या पदाकरिता शासनाकडून प्राप्त होणा-या मागणीपत्राच्या आधारे आयोगाकडून आयोगाच्या संकेतस्थळावर व राज्यातील विविध प्रमुख वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द केली जाते. सदर जाहिरातीमध्ये पदांचा तपशील, भरावयाची अंदाजे एकूण पदसंख्या, मागासवर्गीय, महिला, विकलांग, माजी सैनिक, खेळाडू यांच्याकरिता आरक्षित पदे, वयोमर्यादा, अर्हता, इत्यादी तपशील दिलेला असतो. आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील जाहिरात अधिकृत समजण्यात येते.

१.१.२ आयोगाने जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर संबंधित पदाकरिता अर्ज करणे आवश्यक आहे. जाहिरातीस अनुसरुन प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा. तथापि, प्रत्येक वेळी नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

१.१.३ ऑनलाईन अर्ज प्रणाली व्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने आयोगास अर्ज सादर केल्यास असे अर्ज विचारात घेतले जाणार नाही व यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहारास उत्तरे दिली जाणार नाहीत.

१.१.४ महाराष्ट्र शासन / केंद्र शासन / स्थानिक संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. त्याच वेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे / परीक्षेचे नांव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी आयोगाने विहित केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळवावा. आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास अर्ज स्वीकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तसे आयोगास परस्पर कळविण्याची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेतला जाण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही, हे ही त्यांना कळवावे.

१.१.५ लागू असलेल्या सेवा शर्तीनुसार स्वतःच्या विभाग / कार्यालय प्रमुखांमार्फत अर्ज पाठविणे आवश्यक असणा-या उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने विहित कालावधीत अर्ज सादर केल्यास त्यांच्या अर्जाचा तात्पुरता विचार केला जाईल. तथापि, उपरोक्त परिच्छेद क्रमांक १.१.४ नुसार उमेदवाराने कार्यवाही करणे आवश्यक राहील. विहित मुदतीनंतर अथवा इतर पध्दतीने आलेला अर्ज कार्यालय/विभाग प्रमुखामार्फत पाठविला असला तरी कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतला जाणार नाही.

१.१.६ विहित शुल्कासह अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याबाबत करण्यात आलेली विनंती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

१.१.७ **मदत** :-

उमेदवारांच्या सोयीकरिता संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे सुविधा उपलब्ध आहे. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची यादी www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या केंद्रावर उमेदवाराला ऑनलाईन अर्ज भरणे, उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करणे याकरिता मदत करण्यात येईल. या सर्व सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त विहित रक्कम संबंधित केंद्रामध्ये अदा करावी लागेल.

१.१.८ विहित पद्धतीने अर्ज सादर करण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

१.१.९ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणा-या उमेदवारांना अर्जाची प्रत अथवा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अथवा ऑनलाईन अर्जातच असलेल्या शपथपत्रा व्यतिरिक्त कोणतेही वेगळे शपथपत्र/अफिडेव्हिट आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**१.२ ऑनलाईन पध्दतीने स्वतःची माहिती नोंदविण्याची तसेच अर्ज करण्याची पद्धत** :-

१.२.१ आयोगामार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षा / भरतीसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. पात्र उमेदवाराला वेब आधारित ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे सादर करणे आवश्यक राहील.

१.२.२ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचनांचा संच आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१.२.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे :-

(१) प्रोफाईलची निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

(२) अर्ज सादरीकरण

(३) शुल्क भरणा

१.२.४ **प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे** :-

१.२.४.१ आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईलची निर्मिती करण्याकरीता **"नवीन वापरकर्त्याची नोंदणी** "वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉगइन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव–Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉगइन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

१.२.४.२ प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व जन्मदिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

१.२.४.३ उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरतीप्रक्रियेदरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये आयोगाकडील नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

१.२.४.४ वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

१.२.४.५ **फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे**:-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र/फोटो (रुंदी ३.५ सें.मी. X उंची ४.५ सें.मी.) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-

(१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये.फक्त फोटो स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

(२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे :-




(३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्यांहून आधी काढलेले नसावे आणि ते मुलाखतीच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

(४) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

(५) उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही. स्वाक्षरी संपूर्ण असावी.आद्याक्षरे असू नयेत.तसेच Capital Letters मधील स्वाक्षरीस परवानगी नाही.

(६) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

(७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन **jpg** फॉर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळ्या फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरीची इमेज प्रत्येकी ५० Kb पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

(८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी अथवा मुलाखत/शारीरिक चाचणीच्या वेळी अथवा अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**१.२.५ अर्ज सादरीकरण** :-

(१) आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डव्दारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर **"ऑनलाईन अर्ज "**येथे क्लिक करावे. आयोगाने जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या चालू परीक्षा / पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

(२) ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या **"अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा**या ठिकाणी क्लिक करावे " ".

(३) उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

(४) जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

(५) रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिंग (35+ बँका) द्वारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करून भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे, संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे चलनाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारू शकेल.

(६) www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**१.२.६ शुल्क भरणा** :-

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**"या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील.(अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) च**लना**द्वारे

(४) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट **करता येईल.**

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

(८) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (Status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१.२.७ परीक्षा केंद्र निवड**:-

(१) सरळसेवा भरतीकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी परीक्षेसाठी केंद्र निवड करण्याची आवश्यकता नाही.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

(२) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या अवाजवी असल्याचे निदर्शनास आल्यास मुलाखतीकरीता चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर परीक्षेचा दिनांक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(३) परीक्षेचा दिनांक निश्चित करताना प्राप्त अर्जांची संख्या लक्षात घेऊन संबधित पदाची चाळणी परीक्षेचे ठिकाण निश्चित करण्यात येईल. यासंदर्भातील आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

(४) मुंबई व्यतिरिक्त अन्य ठिकाणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या-त्यावेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

(५) चाळणी परीक्षेकरीता केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१.२.८ अर्ज रद्द करण्याबाबत:-**

(१) उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये ज्या अर्जांच्या स्थिती (Status) मध्ये भरणा केली (Paid) असा संदेश येत असेल असे अर्ज, अर्ज स्वीकारण्याच्या विहित मुदतीमध्ये म्हणजे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी रद्द करता येतील.

(२) एकदा रद्द करण्यात आलेला अर्ज कोणत्याही परिस्थितीत पुनर्जिवित करता येणार नाही.

(३) अर्ज रद्द करण्यासाठी Cancel Application वर क्लिक करावे. Cancel Application वर क्लिक केल्यानंतर पुन्हा एकदा विचारणा केली जाईल. OK बटनावर क्लिक केल्यानंतर अर्ज रद्द करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(४) एखादा अर्ज रद्द करुन पुन्हा नवीन अर्ज करण्याकरिता विहित परीक्षा शुल्काचा पुनः भरणा करणे आवश्यक राहील.

(५) आयोगास सादर केलेला अर्ज रद्द करुन पुन्हा नव्याने अर्ज सादर करण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही आयोगाने संबंधित परीक्षेसाठी विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) अर्ज रद्द करण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अशा प्रकरणी आयोगाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही तक्रारीची / विनंतीची दखल घेतली जाणार नाही.

**१.२.९ प्रोफाईल पहाणे / प्रोफाईल अद्ययावत करणे** :-

स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डव्दारे प्रवेश (Login) केल्यानंतर माझे खाते वर क्लिक करुन उमेदवाराला खालील बाबी करणे शक्य होईल :-

(१) प्रोफाईल पहाणे.

(२) प्रोफाईल अद्ययावत करणे.

(३) प्रोफाईल छापणे.

(४) माझे ॲप्लिकेशन.

(५) अर्ज रद्द करणे.

**१.३ अर्ज भरण्याकरिता महत्वाच्या सूचना:-**

**१.३.१ उमेदवारांना इशारा:-**

अर्जात हेतुपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन न करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेच्या वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाच्या बाहेर अथवा परीक्षेनंतरही तसेच अन्य कोणतेही गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे, काळ्या यादीत समाविष्ट करणे व प्रतिरोधीत करणे (Debar) यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला असतील उमेदवार शासकीय सेवेत असेल तर त्याला विभाग प्रमुखाकडून/शासनाकडून शासकीय सेवेतून बडतर्फ केले जाण्याची शक्यता आहे.

**१.३.२** अर्जाद्वारे आयोगाकडे सादर केलेला दावा अथवा आयोगाकडे सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिका-याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास आयोगामार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षा व निवडींपासून उमेदवारास कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. तसेच इतरही कायदे/नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

**१.३.३** विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल आणि/किंवा इतर योग्य अशा शिक्षेला पात्र ठरेल.

**१.३.४ परीक्षेतील गैरप्रकार करणा-यांना इशारा –**

आयोगातर्फे घेण्यात येणा-या प्रस्तुत परीक्षेत अथवा परीक्षेनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणे जसे प्रश्नपत्रिका फोडणे, बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करणे, दुस-या उमेदवारांकडून मदत घेणे इत्यादी, दुस-या उमेदवारास मदत करणे अथवा कोणत्याही प्रकारे आपली ओळख पटेल अशी कृती करणे, तसा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या पण गैरप्रकार करणा-या व्यक्तीवर महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ मालप्रॅक्टीसेस ॲट युनिव्हर्सिटी, बोर्ड ॲंड अदर स्पेसिफाईड एक्झामिनेशन्स ॲक्ट, १९८२ खाली आणि प्रचलित कायदा व नियमानुसार कारवाई करण्यात येईल. याव्यतिरिक्त संबंधित व्यक्तीस सदर परीक्षेसाठी अथवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षा वा निवडीसाठी कायमस्वरूपी प्रतिरोधित (Debar) सुध्दा करण्यात येईल. उमेदवार शासन सेवेत असेल तर त्याला विभाग प्रमुखाकडून/शासनाकडून शासकीय सेवेतून बडतर्फ केले जाण्याची शक्यता आहे.

**१.३.५ सर्वसाधारण सूचना**

(१) नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः च करणे आवश्यक आहे.

(२) अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

(३) महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नांवाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

(४) एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नांव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

(५) एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा. स्त्री / पुरुष संदर्भात संबंधित सर्कल निवडावे. तसेच, अमागास, मागास, क्रिमी लेअर, विकलांग, माजी सैनिक, खेळाडू, इत्यादी संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी.

(६) शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक मानण्यात येईल व त्याच्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

(७) संबंधित शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमातील सर्व सत्रांच्या परीक्षा विहित दिनांकापूर्वी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. अगोदरच्या सत्रातील/वर्षातील परीक्षेत अनुत्तीर्ण असल्यामुळे कोणत्याही टप्प्यावरील निकाल राखून ठेवण्यात आला असल्यास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण केली असे मानण्यात येणार नाही.

(८) पत्रव्यवहाराचा स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

(९) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय तसेच क्रिमीलेअर, विकलांग, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता स्पष्टपणे / निरपवादपणे (Invariably) दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील सबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही.

(१०) अर्ज सादर करताना केलेला जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडू,तसेच विकलांगत्वाचा दावा इत्यादी बाबींमध्ये तद्नंतर कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. यास्तव आयोगास अर्ज सादर करताना जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडू, तसेच विकलांगत्वाचा दावा अचूक दर्शविला आहे, याची खात्री करून घ्यावी. अर्ज करताना जातीचे अथवा क्रिमि लेअर, माजी सैनिक, खेळाडू, अथवा अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याची सबब सांगून त्यानंतर अर्जातील माहितीमध्ये बदल करण्याची विनंती केल्यास ती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

(११) अर्जाद्वारे आयोगाकडे विविध प्रकारचा दावा करताना शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सुधारित शासन निर्णय, शासन परिपत्रक व आदेश लक्षात घेणे आवश्यक राहील. त्यासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

(१२) अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारास लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी अथवा मुलाखतीसाठी तात्पुरते पात्र समजण्यात येईल. मुलाखतीच्या अगोदर अर्जामध्ये दिलेली पात्रतेविषयक माहिती मूळ कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल व त्याच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र आढळून आल्यानंतरच उमेदवारास मुलाखतीची संधी देण्यात येईल. अन्यथा त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

(१३) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. मुलाखतीपूर्वी अथवा त्यानंतर अन्य कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

(१४) अर्जामध्ये केलेला दावा व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्याने / मिळाल्याने उमेदवारी रद्द होऊ शकते.

(१५) **संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल**.

(१६) संपूर्ण भरुन आयोगास सादर करण्यात आलेल्या अर्जाचे Status उमेदवाराला स्वतःच्या User ID व Passward द्वारे Track Your Application मध्ये कायमस्वरुपी उपलब्ध होईल व केव्हाही पाहता येईल.

(१७) विविध संस्थांकडून एकाहून अधिक सेवेच्या / पदांच्या अथवा इतर परीक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी आयोजित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्ज करतेवेळी कोणत्या पदाकरिता / परीक्षेकरिता अर्ज करावयाचा, याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. अशी परिस्थिती उद्भवल्यास परीक्षेचा अथवा मुलाखतीचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती मान्य करण्यात येणार नाही. तसेच, भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करण्यात येणार नाही.

(१८) एखादया परीक्षेच्या उमेदवारीच्या अनुषंगाने आयोगाशी पत्रव्यवहार करताना वस्तुस्थिती दर्शक माहिती नमूद करणे आवश्यक आहे. पुराव्याविना माहिती देणे, निवेदनात खोटे/ दिशाभूल करणारे आरोप करणे, इत्यादी प्रकारे हेतुपुरस्सर कृती केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराविरुध्द आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

**१.४ आयोगाशी पत्रव्यवहार करण्याची पद्धत** :-

**१.४.१** आयोगाच्या कार्यालयाशी करण्यात येणारा कोणताही पत्रव्यवहार हा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा उपसचिव (सरळसेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या पदनामानेच करणे आवश्यक आहे.

**१.४.२** अर्जदाराने आयोगाशी पत्रव्यवहार करतांना खालील माहिती कळविणे आवश्यक आहे :-

(१) पदाचे नांव, जाहिरात क्रमांक व जाहिरातीचा दिनांक
(२) अर्ज क्रमांक
(३) उमेदवाराचे संपूर्ण नांव व पत्ता
(४) अर्ज केल्याचा दिनांक

**१.४.३** आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहारात वरील संपूर्ण माहिती नसल्यास सदर पत्रव्यवहाराची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**१.५ सर्वसाधारण पात्रता** :-

**१.५.१** उमेदवार (अ) भारताचा नागरिक किंवा (ब) नेपाळचा प्रजाजन किंवा (क) भूतानचा प्रजाजन किंवा (ड) भारतामध्ये कायमचे स्थायिक होण्याच्या उद्देशाने १ जानेवारी, १९६२ पूर्वी भारतामध्ये आलेला तिबेटी निर्वासित किंवा (ई ) भारतामध्ये कायम स्थायिक होण्याच्या उद्देशाने पाकिस्तान, ब्रह्मदेश, श्रीलंका आणि पूर्व आफ्रिकेतील केनिया, युगांडा आणि (पूर्वी टांगानिका व झांजिबार म्हणून ओळखले जाणारे ) टांझानियाचे संयुक्त प्रजासत्ताक, झांबिया, झैरे, मालावी, इथियोपिया आणि व्हिएतनाम येथून स्थलांतर करून आलेली मूळची भारतीय असलेली अशी व्यक्ती असली पाहिजे.

**१.५.२** वरील (ब ) ते (ई ) या वर्गातील उमेदवारांजवळ महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नांवे दिलेले पात्रता प्रमाणपत्र असले पाहिजे.

**१.६ अर्हता व अर्हता धारण केल्याचा दिनांक** :-

**१.६.१ अर्हता** :-

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३ ऑगस्ट,२०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग़ (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ / अभिमत विद्यापीठ (Deemed University) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा AICTE ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थांमधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

(३) स्वायत्त संस्थांचे कोर्स हे भारतातील विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोर्सशी समकक्ष असणे आवश्यक आहे.

(४) सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित केंद्रिय मान्यता मंडळाची (AICTE, MCI, PCI, BCI, NCTE, etc) त्या त्या संस्थेत / महाविद्यालयात / विद्यापीठात अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता असणे आवश्यक आहे.

(५) संशोधनाच्या पदव्यांना त्या त्या विद्यापीठात / अभिमत विद्यापीठात / स्वायत्त संस्थेत असे संशोधन अभ्यासक्रम चालविण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.

(६) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकारार्ह असतील.

**१.६.२ अर्हता धारण केल्याचा दिनांक** :-

(१) संबंधित पदाच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास अथवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता/अनुभव/पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

(२) आंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव (Apprenticeship) निर्धारित केला असेल, अशी पदवी धारण करणा-या उमेदवाराने आंतर्वासिता किंवा आवश्यक अनुभव संबंधित परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

(३) जे उमेदवार पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षाला बसले असतील आणि ज्यांच्या परीक्षेचा निकाल अद्याप जाहीर झाला नसेल, अशा उमेदवारांच्या अर्जाचाही विचार केला जाईल. तथापि जाहिरात / अधिसूचनेत नमूद केलेल्या विहित दिनांकास (अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास) संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर होणे आवश्यक आहे.

**१.७ वयोमर्यादा** :-

**१.७.१** वयोमर्यादेची गणना महाराष्ट्र नागरी सेवा (नामनिर्देशनाने भरतीसाठी उच्च वयोमर्यादेची तरतूद) नियम, १९८६ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

**१.७.२** संबंधित पदाच्या जाहिरातीमध्ये / अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित वयोमर्यादा धारण करणे आवश्यक राहील.

**१.८ विहित वयोमर्यादा शिथिल करणे** :-

**१.८.१** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती.

**१.८.२** दिनांक १ नोव्हेंबर,१९६४ नंतर भारतात स्थलांतर केलेल्या व मूळच्या भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेशी प्रत्यावर्ती व्यक्ती आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर ब्रह्मदेशातून भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती यांच्या बाबतीत पदासाठी विहित केलेली वयोमर्यादा शिथिल करण्यात येते. स्थलांतरित व्यक्ती अनुसूचित जातींपैकी आणि अनुसूचित जमातींपैकी असल्यास त्यांना वयात ५० वर्षांपर्यंतची सूट देण्यात येईल.

**१.८.३** राष्ट्रीय छात्रसेनेत पूर्णकालिक छात्र निदेशक म्हणून भरती करण्यात आलेल्या आणि ज्यांना सेवेतून मुक्त करण्यात आलेले आहे, अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे वय विहित वयोमर्यादेत यावे म्हणून त्यांनी राष्ट्रीय छात्रसेनेत व्यतीत केलेला सेवा कालावधी हा प्रत्यक्ष वयामधून वजा करण्यात येईल. मात्र त्यांनी सेवेतून मुक्त होण्यापूर्वी किमान सहा महिने तरी सेवा बजावली असली पाहिजे.

**१.८.४** प्रादेशिक सेना युनिटच्या कायम कर्मचारीवर्गामध्ये सेवा बजावणा-या किंवा प्रादेशिक सेना नियम ३३ अन्वये किमान पाच वर्षांहून कमी नसेल इतक्या सलग कालावधीसाठी सेवेमध्ये समाविष्ट करून घेण्यात आलेले असेल अशा प्रादेशिक सेनेतून मुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचे वय विहित वयोमर्यादेच्या आत यावे म्हणून त्यांच्या प्रादेशिक सेनेतील सेवेचा कालावधी अधिक दोन वर्षे त्यांच्या प्रत्यक्ष वयामधून वजा करण्याची परवानगी देण्यात येईल.

**१.८.५** अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरितांसह), अनुसूचित जमाती, तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्ग संवर्गातील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादा **पाच वर्षांनी** शिथिलक्षम असेल.

**१.८.६** खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादेत **५ वर्षांपर्यंत** वयाची अट शिथिल करण्यात येईल.

**१.८.७** पात्र विकलांग उमेदवारांना उच्च वयोमर्यादा वयाच्या **४५ वर्षांपर्यंत** शिथिलक्षम राहील.

**१.८.८ माजी सैनिक** :-

**१.८.८.१** किमान पाच वर्षे सैन्यात सलग सेवा झाली आहे व ज्यांना नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यावर कार्यमुक्त केले आहे (यामध्ये ज्यांचे नेमून दिलेले काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण होणार आहे व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे, त्यांचाही समावेश आहे) किंवा ज्यांच्या बाबतीत पाच वर्षांचा सैनिकी सेवेचा नेमून दिलेला कालावधी पूर्ण झाला आहे व ज्यांची नेमणूक पाच वर्षांपुढे वाढवून देण्यात आलेली असून त्यांना शासकीय सेवेत नेमणूक मिळाल्यास तीन महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल, असे प्रमाणित करण्यात येणार असेल, अशा माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यासाठी पाच वर्षे कमाल वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.

**१.८.८.२** शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१० / प्र.क्र.२७९ / १० / १६-अ, दिनांक २० ऑगस्ट,२०१० नुसार माजी सैनिकासाठी शासन सेवेतील गट-क व गट-ड मधील पदासाठी नेमणुकीकरिता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील.

**१.८.८.३** विकलांग माजी सैनिकासाठी गट-क व गट-ड मधील पदांसाठी नेमणुकीकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत राहील.

**१.८.८.४** बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**१.८.८.५** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-१०९०/२२/प्र.क्र.६/९३/१२, दिनांक ८ जून,१९९३ नुसार राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड मध्ये माजी सैनिकाची एकदा नियुक्ती झाल्यानंतर गट - क व गट - ड मध्ये तो धारण करीत असलेल्या


More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील. मात्र त्यांना माजी सैनिक म्हणून माजी सैनिकांसाठी राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

१.८.९ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. शासकीय कर्मचारी याचा अर्थ महाराष्ट्र राज्याच्या कामकाजासंबंधातील कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये ज्याची सेवा कंपनीकडे, महामंडळाकडे, संघटनेच्या स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा अन्य कोणत्याही शासनाकडे सोपविलेली असेल, मग त्याचे वेतन राज्याच्या एकत्रित निधिव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असेल तरीही अशा शासकीय कर्मचा-याचा समावेश होतो.

१.८.१० बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम(बेस्ट)च्या सेवेतील कर्मचा-यांना बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) च्या भरतीकरिता संबंधित जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**१.९ शुल्क** (Fee) :-

**१.९.१ प्रस्तुत भरतीकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे** :-

| अनुभव आवश्यक असलेल्या पदांसाठी | रुपये | अनुभव आवश्यक नसलेल्या पदांसाठी | रुपये |
|---|---|---|---|
| (१)अमागासवर्गीय उमेदवार | ५२३ | (१)अमागासवर्गीय उमेदवार | ३७३ |
| (२)मागासवर्गीय उमेदवार | ३२३ | (२)मागासवर्गीय उमेदवार | २७३ |

१.९.२ शुल्कासंदर्भातील अद्ययावत तरतुदी संबंधित पदाच्या जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१.९.३ वि.जा.(अ), भ.ज.(ब), वि.मा.प्र., भ.ज. (क), भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडणा-या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

१.९.४ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील(क्रिमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तदनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

१.९.५ आयोगास प्राप्त झालेले प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

**२. मुलाखतीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे** :-

२.१ अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अर्जात केलेल्या दाव्यानुसार मुलाखतीच्या वेळी संबंधित कागदपत्रांच्या आधारे पात्रता तपासण्याच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

२.२ मुलाखतीच्या वेळी पात्रतेसंदर्भात खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे :-

**२.२.१ वयाचा पुरावा** :-

**२.२.१.१ खालीलपैकी कोणताही एक पुरावा**:-

(१) मॅट्रिकचे प्रमाणपत्र / माध्यमिक शालांत प्रमाणपत्र

(२) सोबतच्या **परिशिष्ट -एक** मध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले वयाचे प्रमाणपत्र

(३) शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत -उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांच्या सेवाअभिलेख्यात नोंदविलेला त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या सेवा अभिलेख्यातील उता-याची प्रमाणित प्रत

(४) जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविदयालय सोडल्याचा दाखला.

(५) नगर पालिका/महापालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला.

२.२.१.२ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे महानगरपालिकेच्या स्थायी सेवेतील उमेदवार किंवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे उपक्रमाच्या स्थायी सेवेतील उमेदवार यांना उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या त्यांच्या सेवा अभिलेखातील प्रमाणित उता-याची प्रत सादर करता येईल.

२.२.१.३ उमेदवार शासकीय किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या किंवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या स्थायी सेवेत आहे, ही बाब अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद केली असेल, तरच प्रमाणित उता-याच्या प्रती स्वीकारण्यात येतील.

२.२.१.४ शासनाच्या अस्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत जे उमेदवार त्यांच्या नियुक्तीच्या वेळी वयाधिक असतील, त्यांनी उपरोल्लेखित पुराव्याव्यतिरिक्त सक्षम प्राधिका-याच्या वयोमर्यादा शिथिल करण्याबाबतच्या आदेशाची प्रमाणित प्रत पाठवावी.

२.२.१.५ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांच्या बाबतीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, अथवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या सेवेतील पदाच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याचा दावा करणा-या उमेदवारांबाबतीत (लागू असेल तेथे) सोबतच्या **परिशिष्ट - पंधरा** मध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केल्यासच त्यांचा वयोमर्यादेतील सवलतीसाठी विचार करण्यात येईल.

२.२.१.६ इतर कोणत्याही प्रकारचा पुरावा आयोगाकडून स्वीकारण्यात येणार नाही.

**२.२.२ शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा** :-

२.२.२.१ माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेच्या किंवा एखाद्या तत्सम परीक्षेच्या बाबतीत, संबंधित मंडळाचे प्रमाणपत्र. अशा प्रमाणपत्राऐवजी शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वीकारण्यात येणार नाही.

२.२.२.२ उत्तीर्ण केलेल्या पदवी परीक्षांच्या किंवा पदविका परीक्षांच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे विद्यापीठाने / सक्षम प्राधिका-याने औपचारिकरित्या प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

२.२.२.३ पदवी परीक्षा ही पात्रता आवश्यक असलेल्या आणि तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.२.२.४ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा, ही पात्रता आवश्यक असलेल्या पदासाठी १५ वर्षे सैनिकी सेवा झालेल्या माजी सैनिकांनी इयत्ता ८ वी उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी फर्स्ट क्लास सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.२.२.५ गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

२.२.२.६ जेथे पदवीकरिता CGPA / OGPA or Letter grade देण्यात येते, तेथे संबंधित विद्यापीठ / संस्थेच्या निकषानुसार शेकडा गुण नमूद करावेत.गुणांची टक्केवारी पूर्णांकात रूपांतरित करू नये (उदा.५४.५० % असतील तर ५५% नमूद क रू नये.)

२.२.२.७ गुणपत्रक हरवल्यामुळे अथवा गहाळ झाल्यामुळे गुणपत्रकाची दुयमय प्रत सादर केल्यास संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याचा अधिकृत पुरावा बोर्डाच्या/विद्यापीठाच्या सक्षम प्राधिका-याकडून सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.३ मागासवर्गीय उमेदवार असल्याबद्दलचा पुरावा**

२.२.३.१ राज्य शासनाने भरती करण्याच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती म्हणून मान्यता दिलेल्या जमातींपैकी असल्याचा दावा करणा-या उमेदवारांनी तसेच अनुसूचित जातीचा दावा सांगणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-दोन** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची एक प्रत सादर करावी.

२.२.३.२ अनुसूचित जातीतील धर्मांतरित बौद्ध असल्याचा दावा सांगणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-तीन** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

२.२.३.३ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागास वर्ग म्हणून मान्यता दिलेल्या जाती /जमातीपैकी एखाद्या गटाचा असल्याचा दावा करणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-चार** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

२.२.३.४ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

२.२.३.५ वि.जा.(अ), भ.ज.(ब), वि. मा.प्र.,भ.ज.(क), भ.ज.(ड) व इ.मा.व. वर्गवारीचा दावा केला असल्यास अशा उमेदवाराने आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात(एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या वर्षाचे लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन-क्रिमीलेअर(NCL) प्रमाणपत्र मुलाखती/प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापूर्वीचे प्रमाणपत्र आयोगाकडून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२.२.३.६ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या पहिल्या तीनही परिच्छेदात उमेदवाराचे स्वतःचे नाव नमूद केलेले असणे आवश्यक आहे.

२.२.३.७ मागासवर्गीय विवाहित स्त्रियांच्या बाबतीत त्यांनी पूर्वाश्रमीच्या नावाने जातीचे व नॉन-क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२.२.३.७ विशेष कार्यकारी अधिकारी किंवा मानसेवी दंडाधिकारी असलेल्या अथवा सक्षम प्राधिकारी नसलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने दिलेले जातीचे अथवा नॉन-क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

**२.२.४ मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा :-**

(१) माध्यमिक / शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक किंवा विद्यापीठीय उच्च परीक्षा संबंधित भाषा विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे दर्शविणारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाचे किंवा संविधिक विद्यापिठाचे प्रमाणपत्र.

(२) उमेदवार उत्तम रितीने मराठी भाषा वाचू, लिहू आणि बोलू शकतो अशा आशयाचे संविधिक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील किंवा पदव्युत्तर संस्थेतील भाषा शिक्षकाने दिलेले आणि महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र.

**२.२.५ विकलांग व्यक्ती असल्याचा पुरावा :-**

२.२.५.१ अपंग व्यक्ती (समान संधी , हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) नियम, १९९६ तसेच तदनंतर यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विहित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२.२.५.२ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार Software for Assessment of Disability-Maharashtra (SADM) या नवीन संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

२.२.५.३ विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा अथवा विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-सहा** मधील विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

**२.२.६ माजी सैनिक असल्याचा पुरावा :-**

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-सात** मध्ये दिलेल्या नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे ) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.७ अमागास महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :-**

२.२.७.१ अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणा-या अमागास महिला उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-पाच** मध्ये दिलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी अमागास महिला प्रवर्गासाठीचा दावा अर्जात विनिर्दिष्टपणे केला पाहिजे व नॉन-क्रिमीलेयरबाबत 'YES' स्पष्टपणे नमूद केले पाहिजे.

२.२.७.२ अमागास महिला व नॉन-क्रिमीलेअर आरक्षणाचा दावा करणा-या महिला उमेदवारांनी अमागास महिलांकरीता विहित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र मुलाखत/प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२.२.७.३ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमाक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट,२०१४ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार मागास वर्गवारीकरीता प्रदान करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र अमागास महिलांसाठी आरक्षित पदाकरीता ग्राह्य धरले जाणार नाही.

२.२.७.४ अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणा-या अमागास महिला उमेदवारांनी आयोगाने जाहिरात ज्या वित्तीय वर्षामध्ये (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या वित्तीय वर्षाचे लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र मुलाखत/प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.८ खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा :-**



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

२.२.८.१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट-आठ ते परिशिष्ट- बारा** मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे)सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२.२.८.२ खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर मुलाखतीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. तसेच संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे यांच्याकडे प्रमाणपत्रे सादर करताना खेळाडू उमेदवाराने आपली खेळाडू विषयक सर्व प्रमाणपत्रे एकाचवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.९ पूर्व पाकिस्तानातील खराखुरा नवीन स्थलांतरीत असल्याचा पुरावा** :-

भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातील नवीन स्थलांतरितांना म्हणजेच भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून १ जानेवारी,१९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्तींना वयात व फीमध्ये राज्य शासनाने दिलेली सवलतीची मागणी उमेदवार करीत असेल तर त्यावेळी संबंधित उमेदवाराने संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा मदत शिबिराचा शिबीर समादेशक यांनी त्यांच्या दाव्याचा खरेपणाबाबतचे यथोचितरित्या स्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

**२.२.१० विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा** :-

विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नांवात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नांवात बदल झाल्यासंबंधीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.११ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन** :-

**२.२.११.१** सोबतच्या **परिशिष्ट- तेरा** मधील विहित नमुन्यानुसार साध्या कागदावर टंकलिखित करून प्रतिज्ञापन सादर करावे.

**२.२.११.२** प्रतिज्ञापन स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक नाही.

**२.२.१२ अनुभवाचा पुरावा**

**२.२.१२.१** मुंबई नागरी सेवा (वर्गीकरण व सेवाभरती) नियम, १९३९ मधील तरतुदीनुसार अनुभवाची गणना करण्यात येईल.

**२.२.१२.२** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीआर - १०७९/१११६०-XII, दिनांक १८ जुलै,१९७९ नुसार पदासाठी आवश्यक असणारा अनुभव हा (विशिष्टपणे नमूद केलेला नसल्यास ) संबंधित पदाकरिता विहित शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचाच असणे आवश्यक आहे.

**२.२.१२.३** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - एसआरव्ही -२००४ /प्र.क्र.१० / ०४ / १२, दिनांक ३ जुलै,२००४ नुसार शासन सेवेतील निरनिराळ्या पदांवर सरळसेवेने / नामनिर्देशनाने सेवाभरती करण्याकरिता सेवा प्रवेश नियमानुसार विहित अनुभवाच्या कालावधीची गणना करताना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपद्धती, मानधन, इत्यादी स्वरूपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

**२.२.१२.४** तासिका (On hourly basis), नियतकालिक (Periodical), अंशकालीन ( Part time ), विद्यावेतनी ( On Stipend), अभ्यागत (Visiting), अंशदानात्मक (Contributory), विनावेतनी (Without pay) तत्त्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी, प्रभारी (in-charge) म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा (Additional Charge) कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**२.२.१२.५** उपरोक्त परिच्छेद क्रमांक **२.२.१२.३** मध्ये नमूद केलेल्या प्रकारचा अनुभव असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करणे आवश्यक आहे.तसेच सादर केलेल्या अनुभवाच्या प्रमाणपत्रामध्येही त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

**२.२.१२.६** प्रत्येक उमेदवाराने जाहिरातीत नमूद केलेल्या विहित प्रकारचा व त्याने अर्जामध्ये दावा केलेला अनुभव असल्याबद्दलचे दिनांकासह कार्यालयाच्या नाममुद्रित पत्रावर (Letter head) सोबतच्या **परिशिष्ट - चौदा** मधील विहित नमुन्यानुसार अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**२.२.१२.७** आवश्यक अनुभव जाहिरात / अधिसूचनेतील तरतुदीनुसार संबंधित क्षेत्रातील असणे आवश्यक आहे.

**२.२.१२.८** अध्यापकीय पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी अध्यापनाचा(Teaching) दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस संबंधीत विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ अथवा सक्षम प्राधिकारी(लागू असेल त्याप्रमाणे) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२.२.१२.९** आयोगाने वरीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यात व कार्यपध्दतीनुसार अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.

**२.२.१३ ओळखपत्राबाबत**:-

**२.२.१३.१** मुलाखत अथवा प्रमाणपत्र तपासणी करीता येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट , पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैंकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वस्वाछांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**२.२.१३.२ दिनांक** १५ **ऑगस्ट**,२०१६ **पासून आयोगाने आधार कार्ड अनिवार्य केले आहे.**

**२.३ महत्त्वाची सूचना** :-

**२.३.१** उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतीही अनावश्यक व अतिरिक्त कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करू नयेत.

**२.३.२** गुणपत्रिका अथवा सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांच्या पाठीमागील मजकूरसुद्धा निरपवादपणे (Invariably) छायांकित (Copied) केला पाहिजे.

**२.३.३** प्रमाणपत्र इंग्रजी अथवा मराठी व्यतिरिक्त इतर भाषेत असतील तर त्यांच्या छायांकित प्रतींसोबत अधिकृत भाषांतर (Authentic Translation) जोडणे आवश्यक आहे.

**२.३.४** अर्जातील दाव्याच्या पुष्ट्यर्थ संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.

**२.३.५ आयोगाच्या धोरणानुसार पात्र ठरणा-या उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे उमेदवारांची संबधीत पदासाठी पात्रता तपासण्यात येईल.**

**२.३.६** पात्रता / सवलतीसंदर्भात अर्जामध्ये निरपवादपणे दावा केलेला असणे (Claimed) आवश्यक आहे. अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता / सवलत देय होणार नाही. अथवा उमेदवारी अंतिम समजण्यात येणार नाही.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

२.३.७ अर्जाद्वारे आयोगाकडे सादर केलेला दावा अथवा आयोगाकडे सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिका-याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास आयोगामार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षा व निवडींपासून उमेदवारास कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. तसेच इतरही कायदे/नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

२.३.८ मुलाखतीच्या दिवशी उपरोक्त सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. ती सादर करू शकत नसेल तर त्यास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व मुलाखत घेतली जाणार नाही. या कारणामुळे उमेदवार अपात्र ठरत असेल, तर संबंधित परीक्षेची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. अशा प्रकरणी अनुज्ञेय प्रवास भत्ता देय राहणार नाही. तसेच, याची संगणकीय प्रणालीद्वारे नोद घेण्यात येईल. अशा बाबतीत प्रकरणपरत्वे उमेदवारास ब्लॅक लिस्ट करण्याची अथवा आयोगाच्या निवड प्रक्रियेतून कायमचे प्रतिरोधीत करण्याची कार्यवाही होऊ शकते,याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

२.३.९ **पात्रतेसंदर्भातील मूळ प्रमाणपत्राच्या पडताळणीनंतर संबंधीत प्रमाणपत्रांच्या दोन छायांकित प्रती मुलाखत/प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आयोगास सादर करण्यात येणा-या प्रमाणपत्राच्या सदर प्रती प्रमाणपत्र पडताळणी करणा-या अधिका-यासमोर स्व-साक्षांकित** (Self-Attested) **करणे आवश्यक राहील..**

२.३.१० एखाद्या विशिष्ट प्रकरणी कोणतेही मूळ प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करण्यास अधीक कालावधी लागण्याची शक्यता असल्यास, मुलाखतीच्या दिनांकाच्या किमान ७ दिवस अगोदर आयोगास मिळेल, अशा रितीने समर्थनीय कारणासह लेखी विनंती करणे आवश्यक राहील. लेखी विनंतीचा गुणवत्तेवर विचार करुन प्रकरणपरत्वे आयोगाकडून निर्णय घेण्यात येईल. अशा प्रकरणी विनंती गुणवत्तेवर मान्य झाल्यासच मुलाखत घेतली जाईल.

**३. निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया**:-

**३.१ किमान अर्हता**:-

**३.१.१** अर्ज करणा-या सर्व उमेदवारांनी जाहिरातीमधील / अधिसूचनेतील सर्व तरतुदी व अटींची पूर्तता करणे आवश्यक असून याबाबत स्वतःची खातरजमा व अर्जातील विविध दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक ती प्रमाणपत्रे प्राप्त करणे आवश्यक आहे.

**३.१.२** शैक्षणिक अर्हता अथवा अनुभवाच्या पात्रतेबाबत केलेल्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही.

**३.१.३** अर्जामध्ये केलेल्या विविध प्रकारच्या दाव्यांस अनुसरुन उमेदवार पदाच्या विहित अर्हतेबाबतच्या अटींची पूर्तता करीत आहे, असे गृहित धरुन व ही बाब मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्राच्या आधारे तपासण्याच्या अधीन राहून उमेदवारास केवळ तात्पुरत्या स्वरूपात परीक्षेस प्रवेश देण्यात येईल अथवा मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

**३.१.४** केवळ आयोगाकडून लेखी परीक्षेकरिता प्रवेशपत्र पाठविण्यात आले अथवा मुलाखतपत्र पाठविण्यात आले म्हणून आयोगाने संबंधिताची उमेदवारी अंतिमतः पक्की केली, असा अर्थ होत नाही व संबंधितांची मुलाखत घेण्यात येईलच, असे नाही.

**३.१.५** विहित अर्हता किमान आवश्यक अर्हता असून ती धारण करणा-या सर्वच उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी अथवा मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल, असे नाही.

**३.२ अर्जाची छाननी** :-

**३.२.१** भरावयाच्या एकूण पदसंख्येस अनुसरुन मुलाखतीस बोलाविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीच्या अथवा त्यानंतर वेळोवेळी आयोगाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

**३.२.२** आयोगाच्या प्रचलित धोरणानुसार मुलाखतीकरिता खालीलपैकी एक अथवा एकापेक्षा जास्त प्रकारे अथवा प्रकरणाच्या परिस्थितीनुरुप आवश्यक ठरेल अशा अन्य कोणत्याही प्रकारे उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल :-

(१) जाहिरातीमध्ये विहित केलेल्या किमान अर्हतेपेक्षा उच्च अर्हता व अनुभवाच्या आधारे किंवा

(२) जाहिरातीमध्ये विहित केलेल्या किमान अर्हतेपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता

(३) संबंधित क्षेत्रातील अनुभव किंवा

(४) **जाहिरातीमध्ये विहित केलेल्या प्राधान्यशील अर्हता व अपवादात्मक अर्हता किंवा**

(५) किमान आवश्यक अर्हतेनंतर/अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे विहित अर्हतेनंतर धारण केलेल्या अनुभवाची गणना करून किंवा

(६) चाळणी परीक्षेद्वारे

**३.२.३ जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या वाजवीपेक्षा जास्त असेल तर खालील निकषाच्या आधारे मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल**:-

(१) संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये प्राधान्यशील शैक्षणिक अर्हता अथवा प्राधान्यशील अनुभवाची तरतुद असेल तर उच्च प्राधान्यशील अर्हता धारण करणा-या उमेदवारांना मुलाखतीकरीता संख्या निश्चित करताना प्राधान्य देण्यात येईल.

(२) किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या व अनुभव आवश्यक नसलेल्या पदांच्या बाबतीत संबंधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उच्च शैक्षणिक अर्हता म्हणजे संबंधित शाखेतील किमान शैक्षणिक अर्हतेनंतर धारण केलेली त्याच शाखेतील उच्च शैक्षणिक अर्हता. परंतु, किमान शैक्षणिक अर्हतेनंतर धारण केलेली पदविका अथवा पदवी उच्च शैक्षणिक अर्हता मानण्यात येणार नाही.

(३) एम.फिल अथवा समकक्ष पदवी, पीएच. डी. अथवा समकक्ष अर्हता सारख्या इतर सक्षम प्राधिका-याने मान्यता दिलेल्या अर्हता पदव्युत्तर पदवी नंतरची चढत्याक्रमाने शैक्षणिक अर्हता समजण्यात येईल.

(४) पदवीसोबत शिक्षणशास्त्रातील पदवी सारखी व्यावसायिक अर्हता निश्चित केली असल्यास अशी व्यावसायिक अर्हता मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी उच्च शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(५) संबधित शाखेतील किमान शैक्षणिक अर्हतेव्यतिरिक्त अन्य अतिरिक्त पदवी, पदविका अथवा अन्य कोणतीही अर्हता यांना प्राधान्य देण्यात येणार नाही.

(६) मुलाखतीकरीता संख्या निश्चित करण्यासाठी आयोगाने विहित निकषानुसार मुलाखतीसाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत वरील प्राधान्यशील अर्हता अनुक्रमाने विचारात घेण्यात येईल.


More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

(७) किमान शैक्षणिक अर्हता व किमान अनुभव विहित केलेल्या पदांच्या बाबतीत मुलाखतीकरीता संख्या निश्चित करण्यासाठी प्राधान्यशील अर्हतेनंतर कमाल अनुभवाची कालावधी प्रथम विचारात घेण्यात येईल. तरीही मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित न झाल्यास उच्च शैक्षणिक अर्हतेचा विचार करण्यात येईल. अशा पध्दतीने कमाल अनुभवाचा कालावधी व उच्च शैक्षणिक अर्हता विचारात घेऊनही मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या वाजवीपेक्षा जास्त आढळून येत असल्यास संबंधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हतेमधील श्रेणी अथवा गुणांच्या टक्केवारीच्या आधारे उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

(८) किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या व अनुभव आवश्यक नसलेल्या पदांच्या बाबतीत गुणांच्या श्रेणी/टक्केवारीच्या आधारे निकष विहित करण्याबाबत विचार करण्यात येईल.

(९) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येच्या आधारे मुलाख़तीकरीता उमेदवारांची संख्या निश्चित करण्यासाठी कोणताही निकष अंमलात आणणे शक्य नसेल अशा प्रकरणी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी चाळणी परीक्षा घेण्यात येईल.

३.२.४ उपरोक्त पध्दतीने निकष विहित केल्यानंतर त्या निकषानुसार किमान अर्हता धारण करणा-या उमेदवारांनाच परीक्षेसाठी/ मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

३.२.५ केवळ जाहिरातीतील / अधिसूचनेतील किमान विहित अर्हता धारण करित आहे, म्हणून उमेदवारांना चाळणी परीक्षेसाठी अथवा मुलाख़तीसाठी बोलाविले जाण्याचा कोणताही हक्क असणार नाही. चाळणी परीक्षेसाठी अथवा मुलाखतीसाठी बोलाविण्याकरिता उमेदवार योग्य आहे किंवा नाही, तसेच,उमेदवार आयोगाच्या धोरणानुसार विहित मर्यादेत / संख्येत आहे अथवा नाही याची तपासणी करून पात्र असल्याचे आढळून येणा-या उमेदवारांनाच परीक्षेसाठी अथवा मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

३.२.६ आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी उमेदवारास परीक्षा, तसेच मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**३.३ परीक्षा** :-

३.३.१ चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर चाळणी परीक्षेची परीक्षा योजना, प्रकार, अभ्यासक्रम, प्रश्नसंख्या,परीक्षेचा कालावधी, गुणदानाची पध्दत,परीक्षेचा दिनांक, परीक्षेचे ठिकाण इत्यादी बाबी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

३.३.२ चाळणी परीक्षा वस्तुनिष्ठ, पारंपरिक अथवा वस्तुनिष्ठ व पारंपरिक स्वरुपाची असेल.

३.३.३ किमान प्रवेश पातळीवरील (Lowest feeder/ Entry Level) अथवा कोणतीही विशेष अर्हता विहित न केलेल्या अथवा कोणताही अनुभव विहित न केलेल्या पद / संवर्गातील नियुक्तीकरीता चाळणी परीक्षा घेण्यात येत असेल तर चाळणी परीक्षेतील गुण फक्त मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याकरीताच विचारात घेण्यात येतील.

३.३.४ वर नमूद केलेली पदे सोडून इतर कोणत्याही पदाकरीता चाळणी परीक्षा घेण्यात येत असेल तर चाळणी परीक्षेतील गुण अंतिम निवडीकरीता विचारात घेण्यात येतील. अशावेळी मुलाख़तीचे गुण चाळणी परीक्षेच्या एकूण गुणांच्या २५% पेक्षा जास्त असणार नाहीत.

३.३.५ वरीलपैकी कोणत्या पध्दतीची चाळणी घ्यावयाची याविषयी आयोगाकडून प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात येईल. याविषयी परीक्षेपूर्वी निर्णय घेऊन प्रसिध्द केले जाईल. परीक्षा कोणत्या पध्दतीची आहे; याविषयी आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

**३.४ परीक्षेस प्रवेश** :-

३.४.१ परिपूर्ण अर्जासह आवश्यक परीक्षा शुल्क सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशासाठीची पात्रता न तपासता चाळणी परीक्षेला तात्पुरता प्रवेश दिला जाईल. तसेच, परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ प्रवेशप्रमाणपत्राद्वारे कळविण्यात येईल.

३.४.२ उमेदवाराचा संबंधित परीक्षेतील प्रवेश तात्पुरताच राहील आणि त्याने अर्जात दिलेली माहिती खोटी वा चुकीची दिल्यामुळे किंवा पात्रतेच्या अटी पूर्ण करू शकत नसल्याचे अथवा जाहिरातीतील/अधिसूचनेतील तरतुदीनुसार पात्र ठरत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही वेळी आढळून आल्यास या परीक्षेतील त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

३.४.३ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mahampsc.mahaonline.gov.in ) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

३.४.४ प्रवेशप्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.४.५ एस.एम.एस.द्वारे माहिती कळविण्याची सुविधा ही नेहमीच्या पध्दतीव्यतिरिक्त अतिरिक्त सुविधा आहे. त्यामुळे प्रवेशप्रमाणपत्राच्या उपलब्धतेबाबत उमेदवाराने परीक्षेपूर्वी स्वतः खातरजमा करणे आवश्यक राहील.

३.४.६ परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी संबंधित परीक्षा झाल्यावर आयोगाशी संपर्क साधल्यास परीक्षेसाठी उमेदवारीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

३.४.७ प्रवेशपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. प्रवेशपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरुन स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

३.४.८ परीक्षेच्यावेळी प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३.४.९ परीक्षांसाठी निर्धारीत केलेल्या वेळेपूर्वी संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. विलंबाबाबत कोणत्याही कारणाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही व यासंबंधीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच परीक्षा झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही.

३.४.१० परीक्षेस येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**३.५ विकलांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत** :-

३.५.१ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२, दिनांक १८ मार्च, २०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबीं संदर्भात व्यवस्था करण्यात येईल.

३.५.२ परीक्षेच्या वेळी लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत अर्जामध्ये सुस्पष्ट मागणी करणे आवश्यक आहे.

३.५.३ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास व आयोगाची पूर्वपरवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

३.५.४ लेखनिकाची व्यवस्था उमेदवाराकडून स्वतः केली जाणार आहे, की आयोगामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा अर्जात सुस्पष्ट उल्लेख करावा.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

३.५.५ शक्यतो उमेदवार व लेखनिक हे एकाच विद्या शाखेचे असावेत.

३.५.६ उमेदवार स्वतः लेखनिक उपलब्ध करुन घेणार असल्यास त्याचे वय, शैक्षणिक अर्हता, परीक्षेतील गुण व अन्य बाबींसंदर्भात कोणतेही निर्बंध असणार नाहीत.

३.५.७ काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार केंद्रप्रमुखांना राहतील.

३.५.८ वेगवेगळया विषयांच्या पेपरसाठी मुख्यत्वेकरुन भाषाविषयक परीक्षेसाठी वेगवेगळे लेखनिक वापरता येतील.

३.५.९ लेखनिकाची व्यवस्था त्या उमेदवाराने स्वतः केली असल्यास व ऐनवेळी सदर लेखनिक अनुपस्थित राहिल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवारावर राहील.

३.५.१० लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्याने तो परीक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.

३.५.११ **अतिरिक्त वेळ** :-

(१) लेखी परीक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

(२) परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास प्रत्येक तासाला २० मिनिटे याप्रमाणे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

(३) उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनिटे वेळ देण्यात येईल.

३.५.१२ उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारास करावी लागेल.

३.५.१३ लेखनिक आयोगामार्फत / जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुरविण्यात आला असल्यास आयोगाने विहित केल्याप्रमाणे लेखनिकाचे मानधन संबंधित केंद्रप्रमुखांकडे परीक्षा सुरु होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक राहील. लेखनिकाने परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून नियुक्ती-पत्र केंद्रप्रमुखांच्या स्वाधीन करावे.

३.५.१४ प्रवेश-प्रमाणपत्रावरील उमेदवारांना दिलेल्या सर्व सूचनांचे व आयोगाने परीक्षेच्या वेळी दिलेल्या सर्व सूचनांचे लेखनिकाने पालन करणे आवश्यक राहील.

३.५.१५ लेखनिकाने स्वतः प्रश्नपत्रिका सोडवू नये, अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारे मार्गदर्शन वा सूचना करु नयेत. उमेदवाराकडून तोंडी सुचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे एवढेच आवश्यक राहील.

३.५.१६ लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवाराशी चर्चा / गप्पा करु नयेत. तसेच, इतर लेखनिक/उमेदवार यांच्याशी बोलू नये.

३.५.१७ लेखनिकाने व उमेदवाराने आयोगाच्या सूचनांचे पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध प्रचलित कायदे / नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

३.५.१८ परीक्षेच्या वेळी लेखनिकाची व्यवस्था उमेदवार स्वतः करणार असल्यास, खालील माहितीसह अर्ज सादर केल्यापासून १५ दिवसांच्या अवधीत **सचिव**, **महाराष्ट्र लोकसेवा आयोग** यांच्या नांवे अर्जाच्या छायांकित प्रतीसह साध्या कागदावर स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे :-

(१)परीक्षेचे नांव (२) नोंदणी क्रमांक (३) उमेदवाराचे नांव

(४)लेखनिकाचे नांव (५) लेखनिकाचा संपूर्ण पत्ता (६)उमेदवाराची शैक्षणिक अर्हता

(७)लेखनिकाची शैक्षणिक अर्हता (८) उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत काय याबाबतची माहिती.

### ३.६ उत्तरतालिका (Answer-key) :-

३.६.१ वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या सर्व परीक्षांची / प्रश्नपत्रिकांची उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.६.२ उत्तरतालिकेसंदर्भात विहित कालावधीत प्राप्त होणा-या अभिवेदनाचा सर्वसाधारणपणे विचार करण्यात येईल व आवश्यकतेनुसार सुधारित उत्तरतालिका पुन्हा प्रसिद्ध करण्यात येईल.

### ३.७ उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन :-

वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणामधून वजा करण्यात येतील. तथापि, चुकीच्या उत्तरामागे गुण वजा करण्याबाबतच्या तरतुदीसंदर्भात संबधित परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील तरतुदीचे अवलोकन व्हावे.

### ३.८ गुणांची सीमारेषा :-

३.८.१ आयोगाच्या धोरणानुसार गुणांची सीमारेषा ( Cut off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा निश्चित करताना मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित राखण्याच्या, तसेच किमान गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने गुणांची किमान टक्केवारी राखण्यात येईल व सदर टक्केवारी प्रकरणपरत्वे आयोगाच्या धोरणानुसार राहील.

३.८.२ आयोगाच्या धोरणानुसार संबंधित परीक्षेच्या गुणांची सीमारेषा(Cut Off Line)निकालानंतर आयोगाच्या संकेतस्तथळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.८.३ गुणांच्या सीमारेषे संदर्भात प्राप्त होणा-या कोणत्याही अभिवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

### ३.९ गुणांची पडताळणी :-

सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणारी चाळणी परीक्षा ही मुलाखतीकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची / उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेरतपासणी केली जात नाही, अथवा यासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

### ३.१० मुलाखत :-

३.१०.१ उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते अजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो. मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी, ग्रामीण क्षेत्रांच्या स्थितीबाबत त्याला असलेली माहिती आणि ग्रामीण जनतेच्या समस्या यासंबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असतो.

३.१०.२ मुलाखत १०० अथवा ५० अथवा २५ गुणांची असेल.

३.१०.३ मुलाखतीकरीता विचारात घ्यावयाचे गुण उमेदवारांना मुलाखतपत्राद्वारे कळविण्यात येतील.

३.१०.४ मुलाखतीमध्ये किमान ४१% गुण मिळविणा-या उमेदवाराचाच शिफारशीसाठी विचार करण्यात येईल.

३.१०.५ आयोगाने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेसाठी विहित केलेल्या सीमारेषेच्या आधारे अर्जात दिलेल्या माहितीनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

३.१०.६ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे कळविण्यात येईल.

३.१०.७ मुलाखतपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. मुलाखतपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरुन स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

३.१०.८ मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर व निकालानंतर शक्य तितक्या लवकर, त्यांच्या प्रोफाईलमध्ये त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही विषयी त्यांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**३.११ प्रवास खर्च :-**

३.११.१ परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय नाही.

३.११.२ मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी आयोगासमोर स्वखर्चाने हजर होणे आवश्यक आहे.

३.११.३ व्यावसायिक अर्हता धारण करणा-या अथवा यापूर्वी कोणत्याही सेवेत नसलेल्या तसेच उत्पन्नाचे साधन नसलेल्या, म्हणजे जे बेरोजगार आहेत अशा उमेदवारांना रेल्वेचे दुस-या वर्गाचे (सर्वसाधारण ) भाडे आणि / किंवा रेल्वेची सोय नसलेल्या स्थानकांमधील प्रवासासाठी नेहमीचे बसभाडे (साध्या बसच्या भाड्याइतका ) प्रवास खर्च देण्यात येतो. मात्र त्यांनी पुढील गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे :-

(१) प्रवास केल्याचा पुरावा म्हणून रेल्वेचे / बसचे तिकीट, तिकीट क्रमांक किंवा रेल्वे पावतीसारखा इतर कोणताही लेखी पुरावा सादर करणे.

(२) रेल्वेचे सर्वसाधारण द्वितीय वर्ग किंवा साध्या एसटी बसचे आरक्षण शुल्क अनुज्ञेय.

(३) प्रवास खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यासाठी मुलाखतीच्या दिवशी पुरविण्यात येणारा नमुना आणि मागणी केलेल्या रकमेसाठी पावती सादर करणे.

(४) ज्या पदासाठी मुलाखत देण्याच्या उद्देशाने आला असेल त्या पदासाठी आवश्यक अर्हता, निकष असल्यास त्यानुसार, धारण करीत असल्याबद्दल सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे.

(५) रेल्वेतर्फे देण्यात येणा-या प्रवास सवलतीचा लाभ घेतला असल्यास वरील अटींच्या आधीन राहून (खर्च केलेल्या रकमेइतक्या) खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल.

**३.१२ समान गुण धारण करणा-या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :-**

३.१२.१ अंतिम शिफारस यादी तयार करताना मुलाखतीमध्ये समान गुण धारण करणा-या पात्र उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी (Ranking) आयोगाद्वारे खालील निकषानुसार निश्चित करण्यात येईल :-

(१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास धारण केलेली संबधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता व त्यामध्ये विद्यावाचस्पती (डॉक्टरेट), पारंपरिक विद्यापीठाची संशोधन पदव्युत्तर पदवी (एम.फिल.), दूरस्थ शिक्षणाद्वारे संशोधन पदव्युत्तर पदवी (एम.फिल.), पारंपरिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी, दूरस्थ शिक्षणाद्वारे पदव्युत्तर पदवी या उतरत्या क्रमाने.

(२) संबधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक.

(३) सेवाप्रवेश नियम/जाहिरात / अधिसूचनेमध्ये प्राधान्यशील अर्हता विहित केली असल्यास, ती अर्हता.

(४) सेवाप्रवेश नियम/जाहिरात / अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करित असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी.

(५) सेवाप्रवेश नियम/जाहिरात/ अधिसूचनेमध्ये मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्याची तरतूद विहित केली असल्यास, मागासवर्गीय उमेदवार आणि त्यामध्ये अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग या क्रमाने.

(६) वय - वयाने ज्येष्ठ असलेल्यांचा क्रम वरती लागेल.

(७) वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या अद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

**३.१२.२ याबाबत आयोगाचे त्या-त्यावेळचे धोरण व कार्यनियमावलीतील तरतूदी प्रभावी मानल्या जातील.**

**३.१३ पदांचा पसंतीक्रम -**

३.१३.१ लघुलेखक / लघुटंकलेखक पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करताना ज्या पदासाठी अर्ज केला आहे, ते पद त्यांच्या अर्हतेनुसार अर्जामध्ये पद नमूद करणे आवश्यक आहे.

३.१३.२ लघुलेखक/लघुटंकलेखक पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी पदांचा पसंतीक्रम अर्ज करताना ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे.अशा प्रकारे पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारास खालील अटींवर देण्यात येईल :-

(१) अर्ज केलेले पद व पदाचा पसंतीक्रम अर्ज सादर करतानाच ऑनलाईन पद्धतीने नमूद करणे आवश्यक आहे.

(२) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर त्यामधील अर्ज केलेले पद व पदांचा पसंतीक्रम बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(३) आवश्यक अर्हता धारण न करणा-या उमेदवारांच्या बाबतीत संबंधित पदासाठी त्याचा अर्ज व पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही.

**३.१४ शिफारस -**

३.१४.१ संबंधित पदाच्या परीक्षा योजनेनुसार चाळणी परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेण्याची तरतुद आहे; अशा प्रकरणी चाळणी परीक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. इतर सर्व सरळसेवा भरतीच्या प्रकरणी मुलाखतीमधील गुणांच्या आधारे प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी अंतिम निवड करण्यात येईल.

३.१४.२ उमेदवार कोणत्या प्रवर्गाचा आहे अथवा उमेदवाराने कोणत्या आरक्षित पदाकरिता दावा केला आहे, याचा विचार न करता अमागास पदासाठी आवश्यक अर्हता,वय,शुल्क, इत्यादी अटींची पुर्तता करत असल्यासच सर्व पात्र उमेदवारांचा अमागास (सर्वसाधारण) पदांसाठी गुणवत्तेवर प्रथम विचार करण्यात येईल.

३.१४.३ अमागास उमेदवाराकरिता विहित केलेले शुल्क सादर केले आहे व अमागास उमेदवाराकरिता विहित केलेल्या वयाच्या व इतर अटीची पूर्तता करीत आहे, अशा उमेदवाराचाच अमागास (सर्वसाधारण) पदावरील निवडीकरिता विचार करण्यात येईल.

३.१४.४ विशिष्ट प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता त्याच प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

३.१४.५ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांना देय असलेली वय, परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी / निकषांसंदर्भात कोणतीही सवलत/सूट घेतली असल्यास अशा उमेदवाराची अमागास (सर्वसाधारण)पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

३.१४.६ मागासवर्गीयांकरिता तसेच विकलांग, महिला, माजी सैनिक, खेळाडू यांच्याकरिता असलेल्या आरक्षणाच्या अधीन राहून, तसेच विविध पदांसाठी उमेदवारांनी दिलेले पसंतीक्रम विचारात घेऊन (लागू असेल तेथे) अंतिम निकालातील गुणवत्ताक्रमाप्रमाणे भरावयाच्या पदसंख्येइतक्या उपलब्ध जागांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल.

३.१४.७ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच, विकलांग, महिला व खेळाडू उमेदवार चाळणी / लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अथवा आयोगाने केवळ त्यांच्या प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या निकषानुसार मुलाखतीसाठी पात्र ठरल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल व सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

३.१४.८ एकापेक्षा अधिक संवर्गाची पदे भरावयाची असल्यास ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदावरील नियुक्तीसाठी गुणवत्ताक्रमांकानुसार शिफारस केली जाईल. प्रथम पसंती दिलेल्या पदासाठी त्याची निवड होऊ शकली नाही तर गुणवत्ता क्रमांकानुसार दिलेल्या पदांच्या दुस-या, तिस-या वा पुढील पसंतीप्रमाणे शिफारस करण्यात येईल. अंतिमतः दिलेल्या पसंतीक्रमानुसार आयोगाने एखाद्या पदासाठी शासनास शिफारस केल्यास इतर पदांसाठी दिलेले पसंतीक्रम रद्दबातल होतील.

३.१४.९ शिफारस केली आहे ते पद उमेदवाराने न स्वीकारल्यास अथवा अन्य कारणामुळे नियुक्ती होऊ न शकल्यास त्याचा इतर पदांसाठी विचार केला जाणार नाही.

३.१४.१० मागासवर्गीयांना देय असलेली कोणतीही सवलत घेणा-या उमेदवारांचा खुल्या समांतर आरक्षणाच्या पदासाठी विचार केला जाणार नाही.

३.१४.११ अंतिम निकालाआधारे उपलब्ध पदांच्या संख्येइतक्या उमेदवारांचीच निवड केली जाईल. त्यामध्ये मागाहून वाढ केली जाणार नाही.

३.१४.१२ शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.१४.१३ प्रवर्ग म्हणजे सामाजिक तसेच समांतर आरक्षणासाठी शासनाने विहीत केलेले मागास प्रवर्ग.

**३.१५ प्रतीक्षा यादी-**

प्रतीक्षा यादीबाबत आयोगाने वेळोवेळी ठरविलेले धोरण लागू राहील.

**३.१६ गुणपत्रिका -**

३.१६.१ संबधित पदाच्या परीक्षा योजनेनुसार चाळणी परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेण्याची तरतुद आहे; अशा प्रकरणी अंतिम निकालानंतर लेखी परीक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण https://mahampsc.mahaonline.gov.inया संकेतस्थळाद्वारे उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील

३.१६.२ संबधित पदाच्या परीक्षा योजनेनुसार चाळणी परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेण्याची तरतुद नाही ; अशा प्रकरणी चाळणी परीक्षेचे अथवा मुलाखतीचे गुण उमेदवारांना कळविण्यात येणार नाहीत.

३.१६.३ परीक्षा योजनेनुसार फक्त चाळणी परीक्षा घेतलेल्या अथवा निकषाच्या आधारे मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेल्या तसेच मुलाखतीस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांना अंतिम निकालानंतर गुणपत्रिका आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

**४. आरक्षण :-**

**४.१ मागासवर्गाचे आरक्षण :-**

४.१.१ मागासवर्गाचे आरक्षण महाराष्ट्र राज्य लोकसेवा ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

४.१.२ वि.जा.(अ), भ.ज.(ब), वि.मा.प्र., भ.ज. (क), भ.ज.(ड) व इ.मा.व. या मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतुदी शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/ मावक-५, दिनांक १६ जून,१९९४ नुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

४.१.३ जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

४.१.४ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी -१६९६/प्र.क्र.३४/का-१०,दिनांक ७ मार्च,१९९६ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१.५ शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर,२००१, तसेच शासन परिपत्रक,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६ / प्र.क्र. १५/मावक-५,दिनांक ३० जून,२००६ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१.६ महिला उमेदवारांच्या बाबतीत शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.६८७/मावक-५,दिनांक २९ ऑक्टोबर,२००४ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली विवाहापूर्वीचे नांव अंतर्भूत असलेली क्रिमी लेअर मध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

४.१.७ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी - १६९६ / प्र. क्र. ३४ / का - १० , दिनांक ७ मार्च, १९९६ नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना तसेच, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. बीसीसी-१० / २००१ / प्र.क्र.१२० / मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर,२००१ नुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी, तसेच ज्या जातींना उन्नत व प्रगत गटात मोडत



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी खाली नमूद केलेल्या अधिका-यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे :-

(**एक**) संबंधित उपविभागीय अधिकारी (महसूल ) (**दोन**) उपजिल्हाधिकारी किंवा (**तीन**) जिल्हाधिकारी

उपरोक्त सक्षम प्राधिका-यांनी जातीच्या प्रमाणपत्रावर अन्य कोणताही शिक्का न मारता उपविभागीय अधिकारी (महसूल), उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी असा शिक्का मारुन जातीचे प्रमाणपत्र निर्गमित केले असणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्रकारे निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध समजले जाणार नाही.

**४.१.८** शासन परिपत्रक,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९६/प्र.क्र.४८/मावक-५,दिनांक १३ सप्टेंबर,१९९६ नुसार तालुका दंडाधिकारी यांनी दिनांक ३ जून,१९९६पूर्वी प्रदान केलेले जातीविषयक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

**४.१.९** शासन परिपत्रक,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/प्र,क्र.८६/मावक-५,दिनांक २२ नोव्हेंबर,१९९५तसेच शासनपत्र सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१६२/मावक -५ , दिनांक १८ एप्रिल,२००६ मधील आदेशानुसार ज्या व्यक्तींच्या नांवे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमी लेअर मध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नांवाने सर्वसाधारण रहिवास प्रमाणपत्रात प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**४.१.१०** महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०८५/२६३०४/[२१९९]/बीसीडब्ल्यू-५, दिनांक ६ ऑक्टोबर,१९८६ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

**४.१.११** जातीच्या दाखल्यामध्ये पुढील बाबी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे :-

(१) जात स्पष्टपणे लिहिलेली असावी, ती संक्षेपात्मक असू नये.

(२) जातीचे वर्गीकरण जसे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग स्पष्टपणे नमूद करावे.

(३) जातीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात असावे.

(४) प्रमाणपत्रामध्ये ज्या शासकीय आदेशान्वये ती जात मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली असेल, त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद असावा आणि ती व्यक्ती सक्षम प्राधिका-याच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण रहिवासी असल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.

**४.१.१२** मागासवर्गीय उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र स्वतःच्याच नावांने सादर करणे आवश्यक आहे.

**४.१.१३** जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य [Ordinarily Reside(s)] असल्याची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारांस सर्वसाधारणपणे बंधनकारक राहणार नाही. भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा,१९५० च्या कलम - २० नुसार सर्वसाधारण वास्तव्याचा अर्थ लावला जाईल.

**४.१.१४** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील. असे न केल्यास आणि विहित प्रमाणपत्राच्या प्रती न जोडल्यास अशा उमेदवारांचा विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) किंवा इतर मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

**४.१.१५** उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) किंवा इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक संपूर्ण परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे व त्यांना खुल्या गटातील समजण्यात येईल.तसेच ते वयोमर्यादेतील सवलतीसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत. सदर उमेदवारांचा अमागास(महिला) व अमागास (खेळाडू) साठी आरक्षित पदांकरिता विचार करण्यात येणार नाही.

**४.२ महिलांसाठीचे आरक्षण** :

**४.२.१** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे,२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.२.२** महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

**४.२.३** महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

**४.२.४** अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्तीकरिता त्या संवर्गातील योग्य महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा केवळ अमागास वर्गवारीतील उमेदवारांमधूनच गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**४.२.५** अमागास उमेदवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमी लेअर ) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**४.२.६** अमागास महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या अमागास महिला उमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्टाचे अधिवासी (Domicled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.२.७** अमागास महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणा-या अमागास महिला उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या वर्षाचे लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले ‘खुल्या प्रवर्गातील महिलांकरीताचे’ नॉन-क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र मुलाखतीच्या/प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापूर्वीचे प्रमाणपत्र आयोगाकडून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**४.२.८** अन्य मागासवर्गातील उमेदवारासाठी विहित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र अमागास/खुल्या महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता ग्राह्य धरले जाणार नाही.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

४.२.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

४.२.१० शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सी.बी.सी.-१०९८/प्र.क्र.१५१/मावक-५, दिनांक ७ मे, १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणा-या मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

**४.३ विकलांग व्यक्तींसाठीचे आरक्षण** :-

४.३.१ अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम,१९९५ च्या कलम २ मध्ये नमूद केल्यानुसार विकलांग व्यक्तींची व्याख्या खालीलप्रमाणे आहे :-

**(1) Blindness :** Refers to a condition where a person suffers from any of the following conditions, namely:-
**(One)** Total absence of sight; or
**(Two)** visual acuity not exceeding 6/60 or 20/200 (snellen) in the better eye with correcting lenses; or
**(Three)** limitation of the field of vision subtending an angle of 20 degree or worse.

**(2) Low vision :** Means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refractive correction but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device.

**(3) Hearing impairment :** Means loss of sixty decibles or more in the better ear in the conversational range of frequencies.

**(4) Locomotor disability :** Means disability of the bones, joints or muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy.

**(5) Cerebral palsy :** Means a group of non-progressive conditions of a person characterised by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occuring in the pre-natal,peri-natal or infant period of development.

**(6)** All the cases of Orhopaedically handicapped persons would be covered under the category of “Locomotor disability” or “ Cerebral palsy”.

४.३.२ विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी विकलांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

४.३.३ फक्त कायम स्वरूपाचे विकलांगत्व असलेल्या उमेदवारांनाच विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरूपातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना विकलांग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

४.३.४ संबंधित पदाला विकलांग वर्गवारी लागू करण्याबाबत शासनाने जारी केलेल्या शासन आदेशातील विकलांग व्यक्तींच्या वर्गवारीनुसार प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर विकलांग व्यक्तींसाठी असलेले आरक्षण सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे आहेत :-

(1) B = Blind (2) PS = Partially sighted (3) LV = Low vision (4) PD = Partially deaf (5) OA = One arm affected (6) BL = Both legs affected (7) OL=One leg affected (8) BA=Both arms affected (9) BLA = Both arms & legs affected (10) D = Total deaf

उपरोक्त विकलांग वर्गवारीनुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीच्या अथवा प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणा-या उमेदवारांचाच विचार करण्यात येईल.

४.३.५ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ,दिनांक ६ मे,२००४ मधील आदेशानुसार उमेदवार ज्या जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी असेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित विषयातील वैद्यकीय तज्ञांच्या मंडळाचे विकलांगत्वाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र आधारभूत धरण्यात येईल.

४.३.६ सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रनिधित्व कायदा, १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.३.७ विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहित अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच, त्या पदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर विकलांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून शासनामार्फत करून घेण्यात येईल.

४.३.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२००७ / प्र.क्र.६१ / सुधार-३, दिनांक २० एप्रिल,२००७, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक न्याय-२००७ / स.न्या / प्र.क्र.१०३ (भाग-३) / १६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर,२००७ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग -१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.

४.३.९ केंद्र शासनाने ऑफीस मेमोरॅन्डम, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, क्रमांक ३३६०३५/३/२००४-ईएसटीटी(आरईएस), दिनांक २९ डिसेंबर, २००५ अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विकलांग व्यकतीसाठी आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**४.४ माजी सैनिकांचे आरक्षण** :-

४.४.१ माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यांना नागरी सेवेतील राजपत्रित गट - अ व गट - ब मधील पदावर नियुक्ती देतांना वयोमर्यादेत सवलत देण्यात येते. या वयोमर्यादेच्या सवलतीच्या प्रयोजनार्थ खाली नमूद केलेल्या माजी सैनिकांच्या सुधारित व्याख्येनुसार माजी सैनिक गणल्या जाणा-या उमेदवारांचाच विचार केला जाईल :-

An “ Ex-Serviceman “ means a person, who has served in any rank (whether as combatant or as non - combatant ) in the Regular Army, Navy and Air Force of the Indian Union but does not include a person who has served in the Defence Security Corps, the General Reserve Engineering Force, the Lok Sahayak Sena and the Para-Military Forces, and

(i) who has retired from such service after earning his / her pension; or
(ii) who has been released from such service on medical grounds attributable to military service or circumstances beyond his control and awarded medical or other disability pension; or
(iii) who has been released otherwise than on his own request from such service as a result of reduction in establishment; or
(iv) who has been released from such service after completing the specific period of engagement otherwise than at his own request or by way of dismissal or discharge on account of misconduct or inefficency and has been given a gratuity and includes personnel of the Territorial Army of the following categories, namely :-


More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

*(i)* pension holders for continuous embodies services;
*(ii)* persons with disability attributable to military service; and
*(iii)* gallantry award winners.

Provided that any person who has been released prior to 1st July, 1987 :-

(a) at his own request after completing 5 years' service in the Armed Forces of the Union; or

(b) after serving for a continuous period of six months after attestation otherwise than at his own request or by way of dismissal or discharge on account of misconduct or inefficiency or has been transferred to the reserve pending such release; shall also deemed to be an ex-servicemen for the purpose for this clause.

**Explanation-** (1) The persons serving in the Armed Forces of the Union who on retirement from service, would come under the category of " Ex-Servicemen", may be permitted to apply for re-employment one year before the completion of the specified terms of engagement & avail themselves of all concession available to ex-servicemen but shall not be permitted to leave the uniform until they complete the specified terms of engagement in Armed Forces of the Union.

(2) The Armed forces personnel retired / released at their own request but having earned their pension will be included in the term" Ex-Servicemen " defined for the purpose of reservation in posts in Government.

**४.५ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण** :

४.५.१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग; क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५,२१ जून,२००६,१८ जून,२००६, तसेच क्रमांक संक्रीआ-२००७/(प्र.क्र.३२९/०७)/क्रीयुसे-२,दिनांक ११ जुलै,२००१, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संक्रीआ-१००६/(प्र.क्र.१८२/०६)/क्रीयुसे-२, दिनांक ६ मे, २००८, क्रमांक क्रीअसु-१९०८/(प्र.क्र.३९४/०८)/क्रीयुसे-२,दिनांक २१ ऑगस्ट,२००८, संक्रीआ - २०१० / (प्र.क्र.२७०/१०)क्रीयुसे-२ दिनांक १७ ऑगस्ट, २०१०, क्रमांक क्रीस्पर्धा-२१०८/(प्र.क्र.४४०/०८)/क्रीयुसे-२, दिनांक २० सप्टेंबर, २०१३ आणि यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.५.२ क्रीडाविषयक अर्हता** :-

खेळाडूंसाठी आरक्षित पदांवर नियुक्ती देण्यासाठी खेळाडूने क्रीडाविषयक क्षेत्रात खालीलप्रमाणे कामगिरी केलेली असावी :-

**४.५.२.१ गट-अ साठी अर्हता** :

**(एक)** सदर पदांसाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धामधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये भारतातर्फे प्रतिनिधित्व करताना प्रथम द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेले असावे अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

**(दोन)** सदर स्पर्धा या संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजीत केलेल्या असाव्यात.

**(तीन)** उपरोक्त स्पर्धांव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळाच्या असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

**(चार)** भारतीय खेळ प्राधिकरण यांनी आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकप्राप्त खेळाडू. तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

**४.५.२.२ गट-ब साठी अर्हता**

**(एक)** सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधित्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

**(दोन)** सदर स्पर्धा या संबंधित खेळाच्या भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात.

**(तीन)** उपरोक्त स्पर्धाव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंची निवड ही राज्य संघातून झालेली असावी.

**(चार)** भारतीय खेळ प्राधिकरण यांनी आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय स्नानप्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकप्राप्त खेळाडू. तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

**४.५.२.३ गट-क व ड साठी अर्हता**

**(एक)** सदर पदांसाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

**(दोन)** राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य असावे. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

**(तीन)** भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणा-या किंवा सुवर्ण, रौप्य, कास्य पदक प्राप्त करणारे खेळाडू.

**(चार)** भारतीय खेळ प्राधिकरण यांनी आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय स्नानप्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकप्राप्त खेळाडू. तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

**(पाच)** भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रिडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कास्य पदक प्राप्त खेळाडू.

**(सहा)** अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा प्रकारामध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय किंवा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त खेळाडू. तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्यास प्राधान्य देण्यात येईल.

**४.५.३ आरक्षणासाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार** :- विविध गटांसाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार खालीलप्रमाणे आहेत:-


More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

| (अ) इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ | | | | (ब) महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आट्यापाट्या | १७ | सॉफ्ट टेनिस | १ | आर्चरी | १७ | ट्रायथलॉन |
| २ | बॉल बॅडमिंटन | १८ | टेनिक्वाईट | २ | ॲथलेटिक | १८ | व्हॉलीबॉल |
| ३ | बेसबॉल | १९ | थ्रोबॉल | ३ | अक्वटिक्क | १९ | वेटलिफ्टिंग |
| ४ | बिलियर्ड ॲन्ड स्नुकर | २० | ट्रॅम्पोलिन | ४ | बॅडमिंटन | २० | रेस्टलिंग |
| ५ | ब्रिज | २१ | टग ऑफ वॉर | ५ | बॉक्सिंग | २१ | हॉकी |
| ६ | बॉडी बिल्डर्स | २२ | स्कूल गेम | ६ | बास्केटबॉल | २१ | तायक्वांदो |
| ७ | कॅरम | २३ | योगा | ७ | सायकलिंग | २२ | फूटबॉल |
| ८ | सायकल पोलो | २४ | पॅरॉलॉपिक | ८ | जिम्नॅस्टिक | २४ | हॉकी |
| ९ | कराटे | २५ | ब्लाईंड स्पोर्टस | ९ | हॅन्डबॉल | **असोसिएट मेंबर** | |
| १० | मल्लखांब | | | १० | ज्युडो | २५ | कॅनॉईंग ॲन्ड कयाकिंग |
| ११ | मोटर स्पोर्टस | | | ११ | कबड्डी | २६ | मल्लखांब |
| १२ | माऊंटेनिअरिंग | | | १२ | खो-खो | २७ | फन्सिंग |
| १३ | पोलो | | | १३ | लॉन टेनिस | २८ | कॅरम |
| १४ | पॉवरलिफ्टिंग | | | १४ | रायफल | २९ | बॉडी बिल्डर्स |
| १५ | रोलर स्केटिंग | | | १५ | रोईंग | ३० | आट्यापाट्या |
| १६ | रग्बी फुटबॉल | | | १६ | टेबल टेनिस | ३१ | स्केटींग |

| (क) महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे शिफारस केलेले खेळ | | | | (ड) राज्य शासनाने मान्यता दिलेले खेळ | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ब्रिज | ४ | गोल्फ | १ | शुटिंग बॉल |
| २ | चेस | ५ | स्क्वॅश | | |
| ३ | क्रिकेट | ६ | सॉफ्टबॉल | | |

**सदर यादीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.**

**४.५.४ खेळाडूंच्या कामगिरीची प्रमाणपत्रे प्रमाणित करणा-यांची यादी :-**

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळाचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव |
| २ | राष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळाच्या राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव अथवा संबंधित खेळाच्या राज्य संघटनेचे सचिव |

**४.५.५ सर्वसाधारण अटी व मार्गदर्शक तत्वे:-**

(१) खेळाडूंच्या आरक्षित पदांच्या लाभाकरीता खेळाडू हा महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

(२) राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

(३) खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-याकडून विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली असावीत. प्रमाणपत्राचे नमुने सोबतच्या परिशिष्टामध्ये उपलब्ध आहेत.

(४) कोणत्याही खेळाच्या स्पर्धेच्या अधिकृततेबाबत अथवा दर्जाबाबत साशंकता निर्माण झाल्यास संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अहवालाच्या आधारे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या संमतीने देण्यात आलेला निर्णय हा अंतिम असेल.

(५) खेळाडूंचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहील व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) समांतर आरक्षण असल्यामुळे या संवर्गात अदलाबदल अनुज्ञेय होणार नाही व आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही.

(७) एखादा खेळाडू उमेदवार ‘अ’ गटातील नेमणूकीसाठी पात्र असून त्याने ब गटासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यात येईल.

(८) गुणवत्ताधारक पात्र खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारानी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरिता विहित दर्जाची आहेत काय तसेच खेळाचा कालावधी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा आहे काय, याची अर्ज सादर करतानाच खातरजमा करुन ती संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावीत. तरच त्यांना गुणवत्ता धारक पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.

(९) खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणा-या उमेदवाराने त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची सर्व प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपुर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून एकाच वेळी प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. तसेच संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे यांच्याकडे प्रमाणपत्रे सादर करताना खेळाडू उमेदवाराने आपली खेळाडू विषयक सर्व प्रमाणपत्रे एकाचवेळी सादर करणे आवश्यक आहे.

(१०) क्रीडा स्पर्धेमध्ये केवळ भाग़ घेतलेले खेळाडू खेळाडूसाठी आरक्षित पदासाठी पात्र असणार नाहीत.

**४.६ समांतर आरक्षणाबाबत :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१९८/१६-अ दिनांक १६ मार्च, १९९९ , शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र. १६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार समांतर आरक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

४.७ मागासवर्गीय, विकलांग व्यक्ती, महिला अथवा खेळाडूसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असलेल्या उमेदवारांसाठीच अनुज्ञेय आहे. त्यानुसार संबंधितानी अर्जामध्ये स्पष्टपणे दावा करणे व प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.८ आरक्षणासंदर्भातील उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर(www.maharashtra.gov.in) उपलब्ध आहेत.

**५. सर्वसाधारण माहिती :-**

**५.१ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :-**

**५.१.१** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, मधील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील भरतीसाठी सोबतच्या परिशिष्टामध्ये (परिशिष्ट-तेरा)दिलेल्या विहित नमुन्यात प्रतिज्ञापन मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे.

**५.१.२** विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन मुलाख़तीच्या वेळी फक्त विवाहित उमेदवारांनीच सादर करणे आवश्यक आहे.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

५.१.३ प्रतिज्ञापनात अनुक्रमांक ३ येथे नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

५.१.४ या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंब याचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे.

**५.२ संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान** -

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी आवश्यक ठरविलेली संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**५.३. सर्वसाधारण** :-

५.३.१ आयोगाकडे अर्ज सादर केल्यानंतर अर्जात केलेल्या दाव्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याची विनंती आयोगाकडून विचारात घेतली जाणार नाही.

५.३.२ सर्व परीक्षांची उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका ही आयोगाची मालमत्ता असून अनधिकृतपणे हाताळणा-या अथवा जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर प्रचलित कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५.३.३ आयोगाकडे अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंगविषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, आयोगास वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. आयोगाकडे अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल आयोगास न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी आयोगाकडून रद्द करण्यात येईल.

५.३.४ आयोगाने कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधीत केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी संपुष्टात येत असेल तरच अशा उमेदवाराने अर्ज करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच, याबाबत आयोगाकडून उमेदवारास काहीही कळविले जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाशी केलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही.

५.३.५ आयोगामार्फत शिफारस झाल्यावर सार्वजनिक सेवेत उमेदवार योग्य आहे, असे सर्व चौकशीनंतर आढळून आले, तरच शासनाकडून नेमणूक करण्यात येते.

५.३.६ शिफारशीनंतर नियुक्तीविषयक पुढील कार्यवाही शासनाकडून करण्यात येते.त्यामुळे नेमणुकीसंबंधीच्या पत्रव्यवहाराची दखल आयोगाकडून घेतली जात नाही.अंतिम निकालानंतरचा/शिफारशीनंतरचा सर्व पत्रव्यवहार शासनाच्या संबंधित विभागाकडे करावा.

५.३.७ शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांना वैद्यकीय मंडळाकडून शासनाच्या निर्देशानुसार वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. वैद्यकीय मंडळाकडून शारीरिक व मानसिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणित झाल्यानंतरच शासनाकडून संबंधित सेवेसाठी नियुक्ती केली जाते.

५.३.८ एकापेक्षा अधिक पत्नी हयात असणारा कोणताही पुरुष महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेतील नियुक्तीस पात्र असणार नाही.मात्र अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीला हा निर्बंध लागू करण्यापासून सूट देण्यास विशेष कारणे आहेत अशी शासनाची खात्री पटल्यानंतर अशी सूट देण्याचे अधिकार शासनास आहेत.

५.३.९ एक पत्नी हयात असणा-या पुरुषाशी विवाह केलेली कोणतीही स्त्री महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत नियुक्त केली जाण्यास पात्र असणार नाही, मात्र त्या स्त्रीस हा निर्बंध लागू करण्यापासून सूट देण्यास विशेष कारणे आहेत याची खात्री पटल्यानंतर अशी सूट देण्याचे अधिकार शासनास आहेत.

५.३.१० नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांना शासन-सेवेच्या अथवा संबंधित संवर्गाच्या सर्वसाधारण शर्तीनुसार किंवा विशेष आदेशानुसार शासनाने विहित केलेले करारपत्र / बंधपत्र / वचनपत्र इत्यादी विशिष्ट स्वरूपात भरुन दिल्याशिवाय त्यांना नियुक्ती दिली जाणार नाही.

**५.३.११ संघ लोकसेवा आयोगाकडून कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधित केलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून तेवढ्याच कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येईल. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी गणण्यात येईल.**

**५.४ महसुली विभाग वाटप नियम** :-

महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम २०१५ लागू असलेल्या संवर्गाकरिता आयोगाकडून शिफारस झाल्यानंतर विहित प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर महसुली विभाग वाटप करण्यासाठी सक्षम प्राधिका-यांकडून संबंधित नियमातील तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल.

**५.५ उमेदवारी संदर्भातील बदल** :-

५.५.१ उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी शासन अथवा आयोगाद्वारे कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे.सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल, प्रसिद्धी पत्रक, इत्यादी सर्वसाधारणपणे आयोगाच्या संकेतस्तथळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.त्याकरिता उमेदवाराने वेळोवेळी आयोगाच्या वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.

५.५.२ आयोगाने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

**५.६ कामाचे ठिकाण आणि पदग्रहण अवधी** :-

निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीचे आदेश काढण्यात आल्यानंतर ताबडतोब कामावर रुजू होणे आवश्यक असते आणि ती पदे जेथे असतील अशा ठिकाणी किंवा महाराष्ट्र राज्यात अशाच प्रकारची पदे जेथे असतील किंवा भविष्यात निर्माण करण्यात येतील त्या इतर कोणत्याही ठिकाणी उमेदवारांना काम करावे लागेल.

**५.७ परिविक्षा कालावधीतील वेतन** :-

५.७.१ परिविक्षाधीन व्यक्तीला पहिल्या वर्षी वेतन श्रेणीतील किमान दरानुसार वेतन देण्यात येते. उच्च प्रारंभिक वेतन जेथे अनुज्ञेय आहे त्या प्रकरणी उच्च प्रारंभिक वेतन मंजूर करण्याबद्दलचा निर्णय शासनाकडून घेण्यात येतो.

५.७.२ अगोदरपासूनच महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तीचे वेतन, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ चे संरक्षण देऊन त्या नियमावलीनुसार असलेल्या वेतन श्रेणीत निश्चित करण्यात येते.

५.७.३ पहिली वेतनवाढ परिविक्षा कालातील पहिले वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येते आणि नंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर देण्यात येते.

५.७.४ विहित मुदतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे किंवा नैमित्तिक रजेव्यतिरिक्त इतर रजा घेतल्यामुळे परिविक्षा काल वाढविण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या पदाचा परिविक्षा काल समाधानकारक रितीने पूर्ण केल्यानंतर व दीर्घकालीन नियुक्ती झाल्यानंतर दुसरी किंवा नंतरची वेतनवाढ आणि वेतनवाढीची थकबाकी देण्यात येते.

५.७.५ समाधानकारक कामामुळे परिविक्षा काल वाढविण्यात आल्यास त्या बाबतीत, परिविक्षा काल समाधानकारक रितीने पूर्ण केल्याच्या दिनांकापासून दुसरी वेतनवाढ देण्यात येते आणि त्याबद्दलची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय नसते.



More downloads and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**५.८ सेवाप्रवेशोत्तर शर्ती** :-

**५.८.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.८.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंदर्भातील नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.८.३** शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा ४,दिनांक ३१ ऑक्टोबर,२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना, म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम - १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम - १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

